# बृहन्मुंबई महानगरपालिका

**क्रां.म. ज्यो. फुले रुग्णालय, विक्रोळी (पू)**

**क्रं. एचओ/2339/केएमजेपी दि.25.07.2022**

**<u>जाहिर सुचना</u>**

**विषयः क्रां.म. ज्यो. फुले मनपा सर्व साधारण रूग्णालयामध्ये चतुर्थ श्रेणीतील कामगारांची पदे कंत्राटी तत्वावर सहा महिनाच्या कालावधीकरिता अशासकीय संस्थेमार्फत सोडत पध्दतीने भरण्याकरिता अर्ज मागविण्याबाबत.**

बृहन्मुंबई महानगरपालिका एस विभागातील क्रां.म. ज्यो. फुले मनपा सर्व साधारण रुग्णालय, विक्रोळी (पू) येथे सहा महिन्याच्या कालावधीसाठी चतुर्थ श्रेणीतील कामगारांची पदे कंत्राटी तत्वावर महापालिकेच्या नोंदणीकृत असलेल्या (Vendor Code) अशा अशासकीय संस्था (मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 (सन 1950 च्या अधिनियम क्रमांक 29) अन्वये नोंदणी असलेल्या अशासकीय संस्थाकडून सदरची सेवा घेण्यास मोहोरबंद पाकीटात अर्ज (इच्छापत्र) मागविण्यात येत आहे.

अर्जाचा नमुना इच्छुक संस्थांनी क्रां. ज्यो. फुले रुग्णालय, विक्रोळी (पू) - 400 083 येथून रु.3100/- अधिक वस्तू व सेवा कराचे चलन प्राप्त करुन रोख रक्कम किवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. बृहन्मुंबई महानगरपालिका या नावाने मनपाच्या नागरी सुविधा केंद्रामध्ये (सीएफसी) जमा करुन दि.25.07.2022 ते दि.01.08.2022 पर्यंत (वेळ सकाळी 11.00 ते 4.00 पर्यंत) या वेळेत प्राप्त करावे (सार्वजनिक सुट्टी व साप्ताहिक सुट्टी वगळून) पात्र संस्थेच्या यादीतून सोडत पध्दतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप प्रमुख वैद्यकीय अधिकारी अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छुक संस्थांनी अधिक तपशील, अर्ज व इच्छापत्र इत्यादी साठी सदर रुग्णालयाच्या प्रशासकीय कार्यालयात सकाळी 11.00 ते 4.00 या वेळेत संपर्क साधावा.

संस्थेने सदर रुग्णालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख 02.08.2022 दुपारी 11.00 वाजेपर्यंत आहे.

सदर बाबतीत प्राप्त कागदपत्रे ही दि.03.08.2022 रोजी दु.11.00 वाजता उघडण्यात येतील.

**Sd/-**
**प्रमुख वैदयकीय अधिकारी**
**क्रां. म. ज्यो. फुले रुग्णालय, विक्रोळी (पू)**